महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३३ वे | दिनांक : २४/०१/२०२६ | वार : शनिवार

## बाळासाहेब ठाकरे आज नाहीत तेच बरंय - राज ठाकरे



**मुंबई :** शिवसेना संस्थापक पक्षप्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने श्री षण्मुखानंद सभागृहात शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे पुन्हा एकदा एकाच मंचावर आले आहेत. विशेष म्हणजे कल्याण-डोंबिवलीत मनसेने शिवसेना शिंदे गटाला पाठिंबा दिल्यानंतर उभय नेते पहिल्यांदाच एकत्र आले. दरम्यान, कार्यक्रमाच्या सुरुवातीला पोवाडाच्या माध्यमातून महाराष्ट्रातली परिस्थिती तसेच शिवसेना पक्षात घडलेल्या घडामोडींवर भाष्य करत शिंदे गट तसेच भाजपवर टीका करण्यात आली.

मनसे प्रमुख राज ठाकरे यावेळी म्हणाले, माझ्या जमलेल्या सर्व हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे प्रेमींचे मी स्वागत करतो. मला फार सर्दी झाली आहे, त्यामुळे शब्दांवरचे अनुस्वार गेले आहेत. मागे उद्धव आजारी होते तेव्हा माझ्या फॅमिली डॉक्टरांकडून मी औषधं दिली. आता मी त्यांच्याकडून औषध घेत आहे, सहा दिवस झाले अजून बरा नाही. मग मी उद्धवला फोन करून विचारले, माझ्या डॉक्टरांनी पक्ष बदलला की काय, असे म्हणताच एकच हशा पिकला.

पुढे बोलताना राज ठाकरे म्हणाले, आज बाळासाहेबांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू होत आहे. आज सामनामध्ये मी लेख लिहिला आहे, त्यात अनेक आठवणी मी लिहिल्या आहेत. खरे तर त्या व्यक्तीला कसे मांडायचे हे अनेकदा प्रश्न माझ्यासमोर उभे राहतात, काका म्हणून मांडायचे, व्यंगचित्रकार म्हणून मांडायचे की काय.. त्यांचे अनेक किस्से हे न सांगण्यासारखे आहेत. तुम्हाला माहीत नाही काय होते ते, तुम्हाला फक्त भाषणातून झलक दिसली आहे.

राज ठाकरे म्हणाले, मी लहान असतानापासून त्यांना पाहत आलो आहे. बाहेर सगळं भयानक वातावरण सुरू असताना, हे जेव्हा व्यंगचित्र काढायला बसायचे, तेव्हा त्यात मला कधीच मारकाम नाही दिसले. ती समाधी लागणे म्हणतात. ते व्यंगचित्र नसून समाधी असायची. तेंडुलकरांचे एक फार छान पुस्तक आहे, 'हे सगळे येते कुठून', असे ते व्यक्तिमत्व आहे. देशातील सगळ्या राजकारण्यांपासून ते वेगळे होते, त्याचे कारणच ते असायचे.

पुढे बोलताना राज ठाकरे म्हणाले, आज महाराष्ट्राची जी परिस्थिती झाली आहे म्हणजे गुलामांचा बाजार. आजची परिस्थिती बघून मला असे वाटत आहे की बाळासाहेब आज नाहीत तेच बरे आहे. काय त्रास झाला असता त्या माणसाला. कुठे नेतोय आपण? आज ही परिस्थिती बघायला बाळासाहेब नाहीत यापेक्षा चांगली गोष्ट नाही. ज्या गोष्टी शून्यातून उभ्या केल्या. बाहेरच्या पक्षात बघा, अनेक लोक दिसतील की जे बाळासाहेबांनीच निर्माण केली होती.

मी जेव्हा बाहेर पडलो, त्या वेदना वेगळ्या होत्या. माझ्यासाठी पक्ष सोडणे नव्हते, माझ्यासाठी घर सोडणे होते. या सगळ्याला २० वर्षांचा काळ उलटून गेला आहे. अनेक गोष्टी आम्हाला उमगल्या आहेत. ह्या सोडून ते आता. काय सकाळी गेल्यावर साफ झालेली बरी असते, कुठे आयुष्यभर कुंथत बसायचे? असा प्रश्न विचारात खट्याळ जोक यावेळ राज ठाकरेंनी मारला.

राज ठाकरे म्हणाले, बाळासाहेब ठाकरे यांच्यावर मला व्याख्यान द्यायला आवडेल. त्यांच्या सगळ्या पैलू मला उलगडायला आवडेल. बाळासाहेब ठाकरे कसा होता हे जगाला कळलेच नाही. आम्ही घरातले असून आम्हाला कळले नाहीत, तुम्हाला कुठून कळणार? असे राज ठाकरे म्हणाले. त्यानंतर राज ठाकरे यांनी केले ट्विट वाचून दाखवले.

पुढे राज ठाकरे यांनी एक प्रसंग सांगितला, बाळासाहेब कलानगरमध्ये फेऱ्या मारायचे, ही गोष्ट आहे ९४-९५ ची असेल. तेव्हा बाळासाहेब प्रमोद महाजन यांना असे म्हणाले होते की, प्रमोद मी देशातील हिंदूंना मी हिंदू म्हणून मतदान करायला लावेल आणि हिंदू मतदार तयार होतील. प्रमोद महाजन म्हणाले, हे शक्य नाही या देशात. यावर बाळासाहेब म्हणाले तू मला ओळखत नाहीस आणि बाळासाहेबांनी या देशात हिंदूंना हिंदू शक्ती बनू शकते हे दाखवून दिले. भाजपला तर कल्पना पण नव्हती. त्यावेळेला वातावरण सुद्धा वेगळे होते. आज बाळासाहेब असते आणि हिंदुत्वाचा बाजार पाहिला असता, तर निश्चित व्यथित झाले असते. मी काय सांगितले होते आणि तुम्ही काय करून ठेवले? असा प्रश्न त्यांनी विचारला असता. त्यांनी ज्या तडफेने जे विचार मानले, हिंदूंना हिंदू म्हणून जागे केले, मराठीला मराठी म्हणून जागे केले. हे आपण असेच जागे ठेऊ, असे आवाहन राज ठाकरे यांनी यावेळी केले.

## मोदींच्या ट्विटमधून 'हिंदूहृदयसम्राट' गायब



**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेना पक्षाचे संस्थापक स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांची आज जयंती संपूर्ण महाराष्ट्रात उत्साहात साजरी करण्यात आली आहे. अनेक राजकीय नेत्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून बाळासाहेबांना आदरांजली वाहिली आहे. बाळासाहेबांची ओळख शिवसेना असेल किंवा भाजप असेल हे 'हिंदूहृदयसम्राट' अशी करतात. परंतु, जयंतीच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या ट्विटमधून 'हिंदूहृदयसम्राट' हे बिरुद गायब आहे. यावरून शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी जोरदार टीका केली आहे.

अंबादास दानवे यांनी ट्विट करत म्हटले, एखाद्या पोस्टमध्ये 'हिंदूहृदयसम्राट हे बिरुद लिहिलेले नसेल, तर भाजप भक्तांना अतीव दुःख आणि त्रास होतो. आज पंतप्रधान महोदयांच्या पोस्टमधून माननीय साहेबांचे 'हिंदूहृदयसम्राट' हे बिरुद वगळण्यात आले. आता भक्त कोणाला दूषण देणार, कुठे रडारड करणार? कारण त्यांच्या शीर्षस्थ नेतृत्वानेच हा शब्द वगळला आहे, असे दानवे यांनी म्हटले. पक्ष, चिन्ह, नेता आणि आता बिरुद.. गोष्टी लंपास करण्याची मालिका सुरूच दिसते, असा टोलाही अंबादास दानवे यांनी लगावला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट करत म्हटले की, महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय परिदृश्यावर खोलवर परिणाम टाकणारे दिवंगत मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त, या दिग्गज व्यक्तिमत्त्वाला भावपूर्ण आदरांजली. तसेच तीक्ष्ण बुद्धिमत्ता, प्रभावी वक्तृत्व आणि ठाम विचारसरणीसाठी ओळखले जाणारे बाळासाहेब जनतेशी एक अद्वितीय नाते जपून होते. राजकारणाबरोबरच त्यांना संस्कृती, साहित्य आणि पत्रकारितेचीही विशेष आवड होती. व्यंगचित्रकार म्हणून त्यांच्या कारकिर्दीत समाजाचे सूक्ष्म निरीक्षण आणि विविध विषयांवरील निर्भय भाष्य दिसून येते. महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी त्यांच्या दृष्टिकोनातून आम्हाला मोठी प्रेरणा मिळते आणि ती साकार करण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहू, असे मोदींनी त्यांच्या ट्विटमध्ये म्हटले आहे.

दरम्यान, बाळासाहेब ठाकरे यांना आदरांजली वाहताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या ट्विटमध्ये 'शिवसेनाप्रमुख, हिंदूहृदयसम्राट' हे बिरुद वापरले असल्याचे दिसून येत आहे. परंतु, मोदींनी त्यांच्या ट्विटमध्ये हिंदूहृदयसम्राट हे बिरुद वगळण्याचे कारण काय? असा प्रश्न अनेकांना पडला आहे. तर दुसरीकडे कॉंग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी त्यांच्या ट्विटमध्ये बाळासाहेबांना आदरांजली वाहताना 'हिंदूहृदयसम्राट' हे बिरुद वापरले असल्याचे दिसून येत आहे.

## महाराष्ट्र सदन घोटाळ्यात छगन भुजबळांना मोठा दिलासा



**मुंबई :** राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना मोठा दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्र सदन घोटाळ्यात एसीबीनंतर आता ईडीच्या केसमध्येही भुजबळांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. सक्तवसुली संचालनालय (ईडी) छगन भुजबळ यांच्या विरोधात मनी लॉन्ड्रिंगच्या प्रकरणाचा तपास करत होते. या तपासाअंती आता ईडीने छगन भुजबळ यांना निर्दोष मुक्त केले आहे.

सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना छगन भुजबळ यांनी कोणतीही निविदा न मागवता के.एस. चामणकर एंटरप्राइजेसला कंत्राट दिले, असा आरोप त्यांच्यावर करण्यात आला होता. छगन भुजबळ आणि इतरांनी निर्दोष मुक्ततेसाठी केलेला अर्ज कोर्टाने मंजूर केला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने असा दावा केला होता की, सरकारी कर्मचाऱ्यांनी अहवालात चुकीची माहिती दिली आणि बनावट ताळेबंद तयार केले. विकासकाला १.३३ टक्के नफा होणार असल्याचे दाखवण्यात आले, मात्र, प्रत्यक्षात तो ३६५.३६ टक्के होता, असे एसीबीचा आरोप होता.

विशेष न्यायालयाने छगन भुजबळ यांना या प्रकरणी सप्टेंबर २०२१ मध्ये दोषमुक्त केले होते. त्यावेळी न्यायालयाने स्पष्ट केले होते की, विकासकाने भुजबळ किंवा त्यांच्या कुटुंबाला १३.५ कोटी रुपये दिल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. तसेच एसीबीने केलेला नफा-तोट्याचा हिशोब अयोग्य आणि बेकायदेशीर असल्याचेही कोर्टाने नमूद केले होते. कंत्राटाचा अहवाल तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख, परिवहन मंत्री आणि सात वरिष्ठ नोकरशहांच्या समितीसमोर गेला होता. त्यामुळे केवळ चुकीची माहिती देऊन या सर्वांची दिशाभूल केली गेली, हे मान्य करणे कठीण असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले होते.

दरम्यान, महाराष्ट्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने २०१५ साली छगन भुजबळ यांच्या मुंबई, ठाणे आणि नाशिक येथील एकूण १७ मालमत्तांवर छापे टाकले होते. मुंबईतील ७, ठाण्यातील २, पुण्यातील २ आणि नाशिकमधील ५ मालमत्तांवर छापे टाकण्यात आले होते. तसेच भुजबळांवर पदाचा गैरवापर आणि फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात आले होते.

नवी मुंबई येथील हेक्सवर्ल्ड नावाच्या गृहनिर्माण प्रकल्पात सदनिका खरेदीदारांची फसवणूक केल्याचा आरोप छगन भुजबळ यांचे चिरंजीव पंकज भुजबळ व पुतण्या समीर भुजबळ यांच्यावर करण्यात आला होता. २३४४ फ्लॅट्स विकून ४४ कोटी रुपये गोळा केले गेले, परंतु प्रकल्प पूर्ण झाला नसल्याचे सांगण्यात आले होते. सप्टेंबर २०२१ मध्ये विशेष न्यायालयाने पंकज आणि समीर भुजबळ यांना या फसवणुकीच्या प्रकरणातून दोषमुक्त केले होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २४ जानेवारी २०२६

## डॉ. नागनाथ बनसोडे यांचा सेवापुर्तीबद्दल बनसोडे परिवाराकडून विशेष सत्कार




**मुरूम, ता. उमरगा येथील बनसोडे परिवाराच्या वतीने आयोजित नागनाथ बनसोडे, वैशाली बनसोडे यांच्या सेवापुर्ती सोहळयाच्या प्रसंगी महामानवांना अभिवादन करताना चंद्रकांत बिराजदार, अशोक सपाटे, सतिश शेळके, सचिता चव्हाण व अन्य.**

**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयातील मराठी पदवी-पदव्युत्तर विभाग प्रमुख प्रा. डॉ. नागनाथ बनसोडे यांचा गुरुवारी (ता. २२) रोजी बनसोडे परिवाराच्या वतीने सेवापुर्ती सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार होते. नागनाथ बनसोडे व सौ. वैशाली बनसोडे यांचा सपत्नीक सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी नगर शिक्षण विकास मंडळाचे संचालक प्रा. डॉ. सतिश शेळके, प्राचार्य डॉ. सादक वली, माजी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, प्रा. डॉ. महेश मोटे, प्रा. डॉ. यशवंत गायकवाड, महाराष्ट्र बँकेचे शाखाधिकारी सचिता चव्हाण, मराठा सेवा संघाचे अध्यक्ष संजय सावंत, माजी प्राचार्य सच्चिदानंद अंबर आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी महात्मा गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी भूम येथील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. यशवंत गायकवाड, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, तुळजापूरचे ईवाई सुनिल लोंढे आदींनी मनोगत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना बनसोडे म्हणाले की, शैक्षणिक क्षेत्रात काम करताना आलेले अनुभव कथन करून संपूर्ण जीवनाचा लेखाजोखा मांडून सर्वांप्रती कृतज्ञताभाव व्यक्त करून उपस्थितांचे आभार मानले. अध्यक्षीय समारोप डॉ. चंद्रकांत बिराजदार यांनी केला. राम कांबळे, संतोष कांबळे, अमित बनसोडे, अभिजीत सुरवसे, अनिकेत गायकवाड, प्रजीत कांबळे, बाबु कांबळे, भारत गायकवाड, महादेव चौधरी, एलियास बागवान, वैभव कांबळे, अश्वजीत दुरुगकर आदींनी परिश्रम घेतले. प्रा. अण्णाराव कांबळे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार आदित्य बनसोडे यांनी मानले. प्राध्यापक, मुख्याध्यापक, सहशिक्षक, मित्र परिवार, नातेवाईक, विविध संस्था पदाधिकारी आदींनी त्यांचा यथोचित सत्कार केला.

## राज्यस्तरीय कला प्रदर्शनात शिवानी राजगुरूची निवड



**कन्नड (अरुण थोरात) :** महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालय, मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय कला प्रदर्शनात जैतखेडा येथील कु.शिवानी हरी राजगुरु हिने पाठवलेल्या चित्राची निवड झाली असुन संपूर्ण राज्यातुन तिने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. महाराष्ट्रातील असंख्य महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवला. शिवानी हि छत्रपती संभाजीनगर येथील यशवंत कला महाविद्यालयात प्रथम वर्षाचे शिक्षण घेत असुन. जैतखेडा येथील नारायण विद्यालयाची ती माजी विद्यार्थी आहे. या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. यशवंत महाविद्यालयाचे प्राचार्य रविंद्र तोरवणे कला शिक्षिका सरिता उंबरकर, पंढरीनाथ खैरनार, कुमुदिनी चव्हाण, अभिजीत पाटिल, संदीप निकम यांचे तिला मार्गदर्शक लाभले आहे.या यशाबद्दल नारायण विद्यालयाचे मुख्याध्यापक अविनाश पाटील,सुरेश परदेशी, राजेंद्र पाटील, मकरंद भातखेडकर,राजेंद्र पुर्भी व जैतखेडा ग्रामस्थ यांच्या वतीने स्वागत करण्यात आले.

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन




**जालना :** आझाद हिंद सेनेचे संस्थापक नेताजी सुभाषचंद्र बोस व शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात अभिवादन करण्यात आले. प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार करण्यात आले. यावेळी डॉ. बळीराम कटारे यांनी दोनही युगपुरुषांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## श्रीकृष्ण महाविद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती व राष्ट्रीय मतदार दिन साजरा



**उमरगा : (प्रा. नागसेन कांबळे) :** दि. २३.गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात आज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड यांच्या अध्यक्षतेखाली नेताजी सुभाष चंद्र बोस यांची जयंती व मतदान अधिकार दिन संयुक्तपणे साजरा करण्यात आला, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. राजाराम निगडे उपस्थित होते .यावेळी व्यासपीठावर प्रा.डॉ. जगदीश ननावरे प्रा. डॉ.बालाजी कोनाळे उपस्थित होते. प्रा. डॉ .राजाराम निगडे यांनी यावेळी उपस्थिताना मार्गदर्शन करताना म्हणाले की सुभाष चंद्र बोस यांचा जन्म 23 जानेवारी १८९७ साली कटक येथे झाला. ते भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक अग्रगण्य नेते होते. ज्यांना नेताजी म्हणून ओळखले जाते. त्यांनी ब्रिटिश्यांविरोधात लढण्यासाठी जपानच्या मदतीने आझाद हिंद फौजेचे स्थापना केली. त्यावेळी जयहिंद आणि "तुम मुझे खून दो, मैं तुम्हे अजादी दुंगा" या घोषणा खूप गाजल्या आणि लोकप्रिय झाल्या होत्या. त्यांनी कोलकत्ता विद्यापीठातून पदवी घेतली आणि पुढील शिक्षणासाठी ते केंब्रिज विद्यापीठात गेले जिथे त्यांनी आयसीएस ची परीक्षा उत्तीर्ण केली पण देशासाठी नोकरी करण्याऐवजी स्वातंत्र्यलढ्यात उतरले सुरुवातीला त्यांनी चित्तरंजन दास यांच्या मार्गदर्शनाखाली काम केले आणि नंतर काँग्रेस पक्षाचे अध्यक्षही झाले पण त्यांचे आक्रमक विचार आणि ब्रिटिशांशी लढण्याची तीव्र इच्छा यामुळे त्यांच्यात आणि काँग्रेसमध्ये मतभेद होऊन ते काँग्रेस पासून दूर झाले. दुसरे महायुद्ध सुरू असताना त्यांनी ब्रिटिशाविरुद्ध लढण्यासाठी जर्मनी आणि जपानच्या मदतीने आजाद हिंद सेनेची स्थापना केली परंतु त्यांच्या मृत्यूचे गुड आजही कायम आहे. पण आजही ते तरुणांसाठी आणि स्वातंत्र्यासाठी आपले सर्वस्व अर्पण केले. असे सांगून राष्ट्रीय मतदार दिवसाच्या निमित्ताने मतदारांना शपथ दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड यांच्या अध्यक्षीय समारोपानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. मल्लमा आंबुसे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. बालाजी कोनाळे यांनी व्यक्त केले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २४ जानेवारी २०२६


## महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी करियरला प्रथम प्राधान्य द्यावे - डॉ. वेदुला पेठसांगवीकर



**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले)** : श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील वाणिज्य विभागाच्या कॉमर्स असोसिएशनच्या वतीने दि २२ जानेवारी २०२६ रोजी मकरसंक्रांतीनिमित्त "माझी आई महाविद्यालयात" हा उपक्रम महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाणिज्य विभागप्रमुख डॉ अजित अष्टे, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. वेदुला पेठसांगावीकर आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले उपस्थित होते.महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतांना केवळ पुस्तकी ज्ञान न घेता आपल्या स्तरावर विचार करत करिअरला प्रथम प्राधान्य द्यावे व उच्च ध्येय ठेवून उदिष्ट गाठले पाहिजे. असे प्रतिपादन डॉ वेदुला पेठसांगावीकर यांनी आयोजित कार्यक्रमात केले. तसेच महिलांच्या आरोग्यविषयक मार्गदर्शन केले.या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून रोटे. सौ. कविता संजय अस्वले, सौ. रोहिणी अजित अष्टे, सौ. शुभांगी ओमप्रकाश पवार, डॉ. विजयकुमार मुळे, डॉ. खंडू मुरळीकर, प्रा. विद्या गायकवाड आदी उपस्थित होते. सध्या स्पर्धेचे युग असल्याने पालकांनी आपल्या पाल्यांना नियमित महाविद्यालयात पाठवावे. विद्यार्थी महाविद्यालयात नियमित उपस्थित असले तरच त्यांना ज्ञान व कौशल्य प्राप्त होऊ शकेल. आणि त्यांना नोकरी मिळू शकतील. असे कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषणात डॉ. अजित आष्टे यांनी प्रतिपादन केले. शिवाय महाविद्यालयात चालणारे उपक्रम व विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या सोयी सुविधा, करियर कट्टा, पोलिस अकादमी आदीबाबत माहिती दिली. "माझी आई महाविद्यालयात" हा कार्यक्रम आगळ्या वेगळ्या स्वरूपामध्ये साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी भरभरून प्रतिसाद दिला. पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले तर विद्यार्थ्यांनी आपली आई आणि आईवरचे प्रेम कवितेतून सादर करत आभार मानून धन्यवाद व्यक्त केले. याकर्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अक्षता बिरादार यांनी स्वागत गीत गाऊन केले. सूत्रसंचालन प्रा. संध्या चौगुले तर आभार प्रा. विद्या गायकवाड यांनी मानले.

## झळा उन्हाच्या सोसूनी

मायबाप रसिकांनो<br>
ऐका सांगतो कहाणी<br>
माझ्या राबत्या बापाची<br>
होती साधीच रहाणी. १<br>
मुलांसाठी मायबाप<br>
शेतामध्ये राबतात<br>
सुख दुःख विसरुनी<br>
पहाटेच जागतात. २

दुःख सारे पचवूनी<br>
संकटांशी भांडतात<br>
रोज रोज राबतांना<br>
सदा दुःख कांडतात. ३

झळा उन्हाच्या सोसूनी<br>
सुखासाठी धावतात<br>
कष्ट करुनी सदैव<br>
लेकरांना पावतात. ४

शिकवूनी लेकरांना<br>
सुख सारे दावितात<br>
साऱ्या कष्टाची कमाई<br>
शिक्षणात लावितात. ५

थकलेल्या मायबापा<br>
नको विसरू सुखात<br>
तुझ्यासाठी काढलेत<br>
सारी हयात दुःखात. ६

माय बापाच्या कष्टाची<br>
सदा असू द्यावे भान<br>
अरे तेव्हाच मिळेल<br>
समाजात तुला मान. ७



**नागेश बोंतेवाड,**<br>
**छत्रपती संभाजीनगर**

## स्मृतिशेष डॉ. मधुकरराव वासनिक यांनी आयुष्यभर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी निष्ठा जोपासली - श्री. ॲड. मोहन वासनिक



**नागपूर (प्रा. डॉ. चंद्रशेखर पाटील)** : "डॉ. मधुकरराव वासनिक यांनी जीवनभर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी प्रामाणिकता आणि निष्ठा जोपासली. आपले सर्व जीवन डॉ. वासनिक यांनी गरीब, पीडित, वंचित यांच्या सेवेत अर्पण केले. बिडी कामगार कुटुंबात जन्म घेऊन अतिशय प्रतिकूल परिस्थिती चा सामना करून डॉ. वासनिक यांनी वैद्यकीय शिक्षण घेतले आणि स्वतः ला बाबासाहेबांच्या चळवळीला वाहून घेतले. कुठलाही जाती भेद आणि वंशभेद त्यांनी कधीही मान्य केला नाही. प्रसंगी आपल्या समाज बांधवांच्या अधिकारांसाठी राजकीय जीवनात आपले सर्वस्व पणाला लावले. उत्तर नागपूर मध्ये गरिबांची बालरोग तज्ज्ञ म्हणून मोफत वैद्यकीय सेवा अहोरात्र त्यांनी केली. डॉ. वासनिक यांनी पीपल्स वेलफेअर सोसायटीच्या माध्यमातून कळमेश्वर आणि उत्तर नागपूर येथे उच्च शिक्षण महाविद्यालय स्थापन करून शैक्षणिक आणि वैचारिक क्रांती घडविली. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा वैचारिक आणि शैक्षणिक वारसा त्यांनी आयुष्यभर निष्ठेने जोपासला." असे विचार स्मृतिशेष डॉ. मधुकरराव वासनिक यांना आदरांजली देताना संस्थेचे विद्यमान अध्यक्ष ॲड. मोहन वासनिक यांनी व्यक्त केले. डॉ. मधुकरराव वासनिक यांच्या जयंती निमित्य आयोजित उद्योजकता, सांस्कृतिक आणि क्रीडा महोत्सवाच्या समारोपीय सत्राचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. स्थानिक डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू एस कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय कामठी रोड येथे 16 ते 23 जानेवारी 2026 असे सात दिवसीय वार्षिक सांस्कृतिक आणि क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.या महोत्सवाचा समारोप व बक्षीस वितरण सोहळा डॉ. मधुकरराव वासनिक यांच्या 91 व्या जयंती दिनी 23 जानेवारी ला नुकताच संपन्न झाला. समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष पद संस्थेचे विद्यमान अध्यक्ष एड. मोहन वासनिक यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून आंतरराष्ट्रीय योगपटू श्री. संदेश खरे तर लोकमत वृत्त पत्र समूहाचे पत्रकार श्री. आनंद डेकाटे यांना विशेष अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले. याप्रसंगी संस्थेच्या सदस्य प्रा. निशा वासनिक, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रज्ञा बागडे, सांस्कृतिक समिती समन्वयक डॉ. चंद्रशेखर पाटील, उप प्राचार्य प्रा. गामिनी मेश्राम आणि प्रा. रेखा बावनकुळे यांची विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी डॉ. संदेश खरे आणि श्री. आनंद डेकाटे यांचा शाल आणि सन्मान चिन्ह देऊन महाविद्यालयाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. सर्व मान्यवरांनी माजी आमदार आणि संस्थेचे संस्थापक स्मृतिशेष डॉ. मधुकरराव वासनिक यांना आदरांजली वाहिली. "डॉ. वासनिक यांना केवळ पदवी घेऊन नोकरी करणारा विद्यार्थी अपेक्षित नव्हता. तर त्याने सामाजिक वेदना जाणून घेऊन आपल्या समाज बांधवांच्या हक्क आणि अधिकारासाठी लढणारा समाजकारणी बनावे. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचा वारसदार व्हावे. अशी तळमळ आणि अपेक्षा त्यांना होती. असे विचार याप्रसंगी आनंद डेकाटे यांनी मांडले. योगपटू संदेश खरे यांनी " पाण्याने आंघोळ केलेला व्यक्ती फक्त कपडे बदलतो पण घामाने आणि रक्ताने न्हावून निघालेला व्यक्ती इतिहास बदलतो. कितीही कठीण आणि प्रतिकूल परिस्थिती असली तरी विदयार्थ्यांनी हार मानू नये." असे प्रेरणादायी विचार मांडले. सोबतच सर्व विजेते खेळाडू आणि सहभागी स्पर्धकांचे अभिनंदन केले. "डॉ. मधुकरराव वासनिक यांची संघर्ष वृत्ती आणि झुंजार वीर गाथा ही आजच्या विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारी आहे. विद्यार्थ्यांनी आयोजित विविध स्पर्धांच्या माध्यमातून आपले कला गुण जोपासले. हा ध्यास त्यांनी भविष्यातही सुरु ठेवावा आणि आपला उत्कर्ष गाठावा. त्यांना अधिक वृद्धिंगत आणि कुशल बनविण्यासाठी महाविद्यालय सदैव तत्पर राहील." असे आश्वासक विचार यावेळी कार्यकारी प्राचार्या डॉ. प्रज्ञा बागडे यांनी व्यक्त केले. या प्रसंगी संविधान महोत्सवा अंतर्गत आयोजित विविध आंतर महाविद्यालयीन क्रीडा, बौद्धीक आणि सांस्कृतिक स्पर्धाचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह आणि प्रशस्ती पत्रे देऊन करण्यात आले. महिला सक्षमीकरण या विषयावरील आयोजित रांगोळी स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रथम पुरस्कार श्री. प्रणव कांबळे, द्वितीय पुरस्कार श्री. गौरव मसरके. तर तृतीय पुरस्काराची मानकरी कु. रुचिका पाणवरे रीमा ठरली. आंतर महाविद्यालयीन गीत गायन स्पर्धेत एकूण 15 स्पर्धक सहभागी झाले. प्रथम पुरस्कार श्री. सुशांत पाटील , द्वितीय पुरस्कार कु. लाजरी भुरे (वसंत राव नाईक शासकीय कला आणि समाज विज्ञान संस्था ) यांना तर तर तृतीय पुरस्कार कु.लक्ष्मी बोन्द्रे ( राजकुमार केवलरामानी कन्या महाविद्यालय) आणि श्री. जय नांदुरकर ( डॉ. मधुकर राव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय) यांना विभागून प्रदान करण्यात आला. भारतीय संस्कृतीची एकता व विविधता या विषयावर आयोजित पारंपारिक वेशभुषा स्पर्धेत बहुसंख्य विदयार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्रथम पुरस्कार कु. रुचिका लोखंडे (राजकुमार केवल रामानी कन्या महाविद्यालय), तर द्वितीय पारितोषिक श्री. रोनिक ढोके आणि कु. आकांक्षा गायकवाड यांना प्रदान करण्यात आला. तर तृतीय पुरस्कार श्री.प्रणव कांबळे आणि कु. सानिया अन्सारी व श्री. पियुष सहारे . (मधुकर राव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय) यांना विभागून देण्यात आला. भारतीय लोकसंस्कृती वर आधारित आंतर महाविद्यालयीन एकल आणि समूह नृत्य स्पर्धेत बहुसंख्येने विविध महाविद्यालये सामील झाली होती. एकल नृत्य स्पर्धेचा प्रथम पुरस्कार श्री. नागो मेश्राम (फर्ग्युसन कॉलेज, पुणे), द्वितीय पुरस्कार श्री. गौरव मसरके आणि तृतीय पुरस्कार रा. तू. म. नागपूर विद्यापीठ ललित कला विभागाची विद्यार्थिनी कु. राधिका कुलकर्णी हिने पटकावला. समूह नृत्य स्पर्धेचे दोन्ही मानकरी महाविद्यालयाचे विद्यार्थी गौरव मसरके आणि चमू ठरली. सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्राचे वितरण मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. समारोपीय सत्राचे सूत्रसंचालन प्रा. प्रियंका राऊत यांनी केले. सांस्कृतिक स्पर्धेच्या विजेत्यांची घोषणा डॉ. सुमेध नागदेवे यांनी केली तर क्रीडा स्पर्धेच्या पुरस्कार विजेत्यांचे वाचन डॉ. सौरभ मोहोड यांनी केले. मान्यवरांचे, उपस्थितांचे आणि ह्या सांस्कृतिक आणि क्रीडा महोत्सव यशस्वीते बाबत सर्वांचे आभार महोत्सव आयोजन समितीचे समन्वयक डॉ. चंद्रशेखर पाटील यांनी मानले. समारोपीय कार्यक्रमाला वरिष्ठ, कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाविद्यालयाच्या परंपरेनुसार कार्यक्रम राष्ट्र गीताने संपन्न झाला.

## पीएमश्री केंद्रीय विद्यालय नाशिक रोड कॅम्प येथे 'परीक्षा पे चर्चा २०२६' विषयावर प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन




**नाशिक (प्रतिनिधी)** : शहरातील तोफखाना केंद्र परिसरातील पीएम श्री केंद्रीय विद्यालय, नाशिक रोड कॅम्प येथे शुक्रवारी सकाळी परीक्षा पे चर्चा २०२६ अंतर्गत एक ज्ञानवर्धक प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत परिसरातील ५ केंद्रीय विद्यालयासह, जवाहर नवोदय विद्यालय, दिल्ली पब्लिक स्कूल आणि अन्य १० शाळांमधील सुमारे १२० विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. प्रश्नमंजुषा परीक्षा पे चर्चा या संकल्पनेवर आधारित होती, ज्यामध्ये वेळ व्यवस्थापन, मानसिक आरोग्य, आत्मविश्वास आणि ध्येय निर्धारण यांसारख्या विषयांचा समावेश होता. प्रारंभी प्राचार्य गजराज मीना यांनी परीक्षा पे चर्चा उपक्रमाची माहिती देत अभ्यासाच्या चांगल्या सवयी कशा विकसित करता येतील आणि वेळेचे व्यवस्थापन या विषयी समुपदेशन केले. स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी आपले ज्ञान सादर करताना संघभावना व शिस्तीचे उत्कृष्ट उदाहरण मांडले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी अमित कुमार शुक्ला, रोहीत गौड, सागर काठोळे, महादेव इघारे, आरीफ बेग, अमृत बागुल, बिरबल यादव, इकबाल पठाण, प्रविण अराख, वैशाली, सिमरन चौरसिया, पिंटू टाक, आदींचे मोलाचे योगदान लाभले. कार्यक्रमाच्या शेवटी विजेत्या संघांचा बक्षिसे देऊन सन्मान करण्यात आला तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २४ जानेवारी २०२६

# मुक्त विद्यापीठाच्या ‘मुक्तांगण’ दिनदर्शिका २०२६ चे विविध मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन

**छत्रपती संभाजीनगर :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र डॉ. दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा महाविद्यालयाच्या वतीने काढण्यात आलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु प्रो. डॉ. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरु डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, प्रभारी कुलसचिव आणि वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परिक्षा नियंत्रक डॉ. भटूप्रसाद पाटील, विभागीय संचालक डॉ. नंदकुमार राठी, डॉ. जयदीप निकम, प्रा. नागार्जून वाडेकर यांच्यासह विविध मान्यवरांच्या शुभहस्ते पार पडला.



मुक्तांगण दिनदर्शिका २०२६ चे प्रकाशन करतांना, कुलगुरु प्रो. डॉ. संजीव सोनवणे सोबत प्राचार्य डॉ. हसन इनामदार




दिनदर्शिकेचे प्रकाशन करतांना प्र-कुलगुरु डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, सोबत परिक्षा नियंत्रक डॉ. भटूप्रसाद पाटील, मानव्य विद्या आणि सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे संचालक प्रा. नागार्जून वाडेकर, निरंतर शिक्षण विद्याशाखेचे संचालक डॉ. जयदीप निकम, आणि इतर दिसत आहेत.



मुक्त विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव आणि वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे,



विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक प्रा. डॉ. प्रकाश देशमुख




मुक्त विद्यापीठाच्या छ. संभाजीनगर विभागीय केंद्राचे संचालक डॉ. नंदकुमार राठी.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २४ जानेवारी २०२६

## श्रीराम मंदिर प्राण प्रतिष्ठा वर्धापन दिनानिमित्त रघुकुल प्रतीक कोविदारचे रोपण



**कन्नड (अरुण थोरात) :** अयोध्या येथील श्रीरामांच्या प्राण प्रतिष्ठे चा २२ जानेवारी हा वर्धापन असून देशभर हा उत्सव साजरा होत असतो. या दिनाचे औचित्य साधत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, सिल्लोड जिल्हा (गतीविधी )च्या वती व अभिनव प्रतिष्ठानच्या वतीने कोविदार या देव वृक्षाचे आज अजिंठा येथील ऐतिहासिक श्रीराम मंदिराच्या परिसरात इतिहास संशोधक विजय पगारे, डॉ. संतोष पाटील, राजू देशमुख, प्रसाद झलवार, विजय झलवार, मुकेश पुरे, सुजित गुप्ता, विकास गुप्ता, पुरण सिंग तोमर, ई उपस्थिती त रोपण करण्यात आले आहे. सदर वृक्ष प्रभू श्रीराम यांच्या रघुकूलाचा राजवृक्ष असून तो समृद्धी तथा हिंदू वैभव याचे प्रतीक मानला जातो. देशात सर्व प्रथम या निमित्ताने सिल्लोड संघाच्या माध्यमातून डॉ. संतोष पाटील जिल्हाभर हे रोपण करत आहे. अयोध्या येथील श्री राम मंदिरावर उभारण्यात आलेल्या धर्म ध्वजा वर हा राजवृक्ष चित्रित केलेला आहे. या विषयी शास्त्रीय माहिती असलेली फ्रेम सूर्यकिरण अर्बन बँकेचे व अभिनव प्रतिष्ठानचे अध्यक्ष किरण पा. पवार यांच्या वतीने मंदिरात लावण्यात आली आहे. रामायनात सुंदर कांडात आद्यकवी महर्षी वाल्मिकी यांनी यदा न खलू दुर्बुद्धी भरत:स्वयं मागत:स एष ही महाकाय: कोविदार ध्वज रथे ll असे काव्यात्मक वर्णन व उल्लेख केला असल्याचे डॉ. संतोष पाटील यांनी सांगितले.

# नितेश राणेंकडून उद्धव ठाकरेंना आणखी एक धक्का



**मुंबई :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा धुरळा उडालेला असतानाच कणकवली पंचायत समितीतील एका घडामोडीने राजकीय वर्तुळाचं लक्ष वेधून घेतलं आहे. पंचायत समिती निवडणुकीत कणकवली तालुक्यातील वरवडे मतदारसंघातून भाजपचे उमेदवार सोनू सावंत हे बिनविरोध निवडून आल्याने ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. विशेष म्हणजे, शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार सुधीर सावंत आणि मनसेचे उमेदवार शांताराम साद्ये यांनी ऐनवेळी माघार घेतल्यामुळे भाजपच्या पारड्यात हा विजय सहज गेला. पालकमंत्री नितेश राणे यांच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात भाजपचा हा तिसरा बिनविरोध विजय ठरला असून, यामुळे ठाकरे गटाची कणकवलीतील पकड सैल होत चालल्याचं स्पष्ट चित्र दिसत आहे.

राज्यात सध्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. आधी नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या निवडणुका पार पडल्या, त्यानंतर महापालिकांच्या निवडणुका झाल्या. या निवडणुकांमध्ये अनेक ठिकाणी बिनविरोध निकाल लागले आणि त्याचा मोठा फायदा भाजप आणि शिवसेना शिंदे गटाला झाल्याचं चित्र होतं. महापालिकांच्या निवडणुका आटोपताच आता निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांची घोषणा केली आहे. आयोगाच्या जाहीर कार्यक्रमानुसार येत्या ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून, ७ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे. मात्र, प्रत्यक्ष मतदानाआधीच अनेक ठिकाणी राजकीय समीकरणं बदलत असल्याचं दिसून येत आहे.

महापालिकांच्या निवडणुकांदरम्यान मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या काही उमेदवारांनी ऐनवेळी माघार घेतल्यामुळे भाजप आणि शिंदे गटाला बिनविरोध विजयाचा फायदा मिळाला होता. यावर ठाकरे गटाने तीव्र आक्षेप नोंदवला होता. मात्र, आता हाच पॅटर्न पुन्हा एकदा जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्येही पाहायला मिळत आहे. कणकवली तालुक्यातील वरवडे पंचायत समिती मतदारसंघात घडलेली घटना त्याचाच प्रत्यय देणारी ठरली आहे. विरोधकांच्या माघारीमुळे भाजपचे उमेदवार कोणतीही लढत न होता निवडून आले, यामुळे ठाकरे गटात अस्वस्थता निर्माण झाली आहे.

वरवडे पंचायत समिती मतदारसंघातून शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार सुधीर सावंत आणि मनसेचे उमेदवार शांताराम साद्ये यांनी निवडणुकीतून माघार घेतली. या निर्णयामुळे भाजपचे सोनू सावंत बिनविरोध निवडून आले. या घटनेनंतर राजकीय चर्चांना उधाण आलं असून, ही माघार नेमकी कशामुळे घेतली गेली, याबाबत तर्कवितर्क लावले जात आहेत. पालकमंत्री नितेश राणे यांचा सिंधुदुर्ग जिल्ह्यावर असलेला प्रभाव पुन्हा एकदा अधोरेखित झाला असून, भाजपची बिनविरोध विजयाची मालिका कायम असल्याचं दिसून येत आहे.

कणकवली तालुक्यात यापूर्वीही भाजपचे उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. आता पंचायत समितीतील हा तिसरा बिनविरोध विजय असल्याने भाजपच्या स्थानिक संघटनबळाची चर्चा सुरू झाली आहे. दुसरीकडे, शिवसेना ठाकरे गटासाठी हा सलग धक्क्यांचा सिलसिला मानला जात आहे. विशेष म्हणजे, या मतदारसंघातून मनसेच्या उमेदवारानेही माघार घेतल्यामुळे ठाकरे गट एकाकी पडल्याचं चित्र दिसत आहे. आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही घडामोड ठाकरे गटासाठी चिंताजनक मानली जात आहे.

या सगळ्या घडामोडींमुळे उद्धव ठाकरे यांना कणकवलीमध्ये पुन्हा एकदा राजकीय धक्का बसल्याचं बोललं जात आहे. नितेश राणे यांनी आपल्या मतदारसंघात भाजपची पकड अधिक मजबूत करत विरोधकांना अडचणीत आणल्याचं चित्र आहे. महापालिकांच्या निवडणुकांनंतर आता पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकांमध्येही भाजपची सरशी होत असल्याने राजकीय समीकरणं वेगाने बदलत आहेत. ठाकरे गटाकडून या माघारींबाबत आक्षेप घेतला जाण्याची शक्यता असून, येत्या काही दिवसांत या प्रकरणावर राजकीय आरोप-प्रत्यारोप अधिक तीव्र होण्याची चिन्हं आहेत.

## अज्ञानाच्या राखेत दबलेलं विज्ञान

भाकडकथांच्या गोंगाटात शहाणपणाचे दिवे विझले,
“जग मिथ्या” म्हणता म्हणता हातातलं कामच सुटले.
जातं-नांगर शतकानुशतके तेच—
काळ पुढे धावतो, आपण मात्र मागेच.

विज्ञान दाराबाहेर, अज्ञानाला हार,
नागवे विचार मिरवतो अभिमानाने फार.

“देवाची करणी, नारळात पाणी” म्हणत राहिलो,
निरीक्षणाआधीच मंत्रांनी विचार मारत गेलो.
जग प्रश्न विचारत पुढे झेपावत गेलं,
आपण श्रद्धेच्या साखळीत बुद्धी गहाण ठेवत गेलो.

न्यूटनने जर शंका दारातच टाकली असती,
तर गुरुत्वाकर्षण जन्मालाच आलं नसतं.
संशय त्याने स्वीकारला, म्हणून जग उजळलं—
आपण मात्र अंधभक्तीच्या गुलामीतच अंधारत गेलो.

मोक्षाच्या मोहात इहलोक हरवला,
अध्यात्म वाढलं—पण एकही शोध उगवला नाही.
अंधश्रद्धा वाढल्या, प्रयोगशाळा रिकाम्याच,
अज्ञानाच्या सावलीत विज्ञान कोमेजत गेलं.

धूप-नारळाच्या धुरात मेंदूचं तेल आटलं,
“देव पाहील” म्हणत निर्णय टळत राहिले.
जग कृत्रिम बुद्धीवर नाचतंय आज,
आपण अजूनही ग्रहदोषात दिवस मोजतोय.

भुतं-खेतं, वार-तिथी, नक्षत्र-दोषांचा जंजाळ,
विचाराचं चाक गंजून पडलं काल.
ज्ञान नव्हे, भय वाढवलं;
शोध नव्हे, श्रद्धेचं जाळं विणलं.

पण पुरे आता—
भारत उभा राहील विज्ञानावर,
अंधभक्तीच्या गोंगाटावर नाही.
प्रयोग, निरीक्षण, शंका—हीच नवी पूजा,
“देव करेल” नव्हे—
“मी करणार!” म्हणणारी पिढीच उद्या घडवणार.

**प्रभाकर गायकवाड, छत्रपती संभाजीनगर**

प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २४ जानेवारी २०२६


# मराठा समाज अग्रेसर असतांना मागास कसा?



**मुंबई(प्रतिनिधी) :** मराठा समाजाला सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात १०टक्के आरक्षण देण्याच्या २०२४ मध्ये केलेल्या कायद्याच्या वैधतेला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे.या शिवाय आरक्षणा च्या समर्थनार्थ आणि विरोधात हस्तक्षेप याचिकाही दाखल केल्या आहे.त्या सर्व याचिकांवर न्या.रवींद्र घुगे,न्या.संदीप मारणे व न्या.निजामुद्दीन जमादार यांच्या विशेष पूर्णपीठापुढे नियमित सुनावणी सुरू आहे. शासकीय,निमशासकीय कर्मचारी म्हणून मराठा समाजाचा टक्का मोठा आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेणारे त्या सोबत शिक्षक, प्राध्यापकांच्या नोकरी मध्येही मराठा समाज अग्रेसर आहे मग ते मागासलेले कसे ? असा सवाल न्यायालया समोर उपस्थित करण्यात आला तर निवृत्त न्यायमूर्ती शुक्रे यांच्या आयोगाने मराठा समाजालाच आरक्षण देण्याची शिफारस का केली अशी विचारणाही मराठा समाजाला विरोध करणाऱ्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील अनिल अंतुरकर यांनी केली. आयपीएस,आयएएस,आयएस या पदांवरही मराठा समाजाचे अधिकारी कार्यरत आहेत. ते फक्त राज्यापुरते मर्यादित नाहीत.बंगालसह केरळमध्येही मराठा समाजाचेअधिकारी कार्यरत आहेत.काही मराठा हे परदेशात शिक्षण अथवा नोकरी,व्यवसाय करीत आहेत. त्यामुळे मराठा समाज हा मागासलेला असल्याचे आयोग कसे म्हणू शकतो, असा युक्तिवाद ही याचीका कर्त्यांचे जेष्ठ वकील अनिल अंतुरकर यांनी केला. पुढील सुनावणी १३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. मराठा समाजाला नोकरी आणि शिक्षणात आरक्षण मिळावं यासाठी राज्य सरकारने एसईबीसी कायदा तयार केला.या कायद्याच्या घटनात्मक वैधतेला हायकोर्टात आव्हान देण्यात आलंय तर मराठ्यांना आरक्षण मिळावं यासाठी सदरची याचिका दाखल करण्यात आल्या आहेत.मराठा समाजाच्या वतीने मुख्य हस्तक्षेप याचिका कर्ता डॉ.राजेंद्र दाते पाटील यांच्या वतीनेॲड मधुर गोलेगावकर व ॲड श्रेयस देशपांडे, तर ॲड सागर मडके हे सहाय्क म्हणुन कार्यरत आहे. विशेष म्हणजे मुंबई उच्च न्यायालयात मराठा समाजाच्या वतीने अनवाणी असलेले जेष्ठ अभ्यासक मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ता डॉ राजेंद्र दाते पाटील,प्राचार्य तांबे, प्रा.अंबादास मोहिते, आदी मान्यवरच फक्त उपस्थित राहतात हे विशेष होय.मराठा समाजाला एसईबीसी कायद्याअंतर्गत दिलेलं आरक्षण आकलना पलिकडचं आहे.सर्वोच्च न्यायालयानं आरक्षणाची घालून दिलेली ५० टक्के मर्यादा मराठा आरक्षणा मुळे ओलांडली गेली आहे. इतकेच नव्हे तर मराठा आरक्षणा मुळे इतर समाजा च्याआरक्षणा वर ही अतिक्रमण झाल्याचा दावा याचिका कर्त्यांच्या वतीने उच्च न्यायालय मुंबई येथे करण्यात आला आहे. मान्यवर वकीलांचा सहभाग ॲड अरविंद दातार,ज्येष्ठ वकील अधिवक्ता गोपाल शंकर नारायणन वरिष्ठ अधिवक्ता प्रदीप संचेती, ॲड.पल्लवी बाली, आशिष मिश्रा,प्रथमेश कामत,यशओझा,कु. निझिका पिंटो, विष्णुदत्त मिश्रा,अश्विन देशपांडे याचिकाकर्त्या साठी तर निहार चित्रे आणिकु.त्रिशा चंद्रास ॲड सुभाष झा,हरे कृष्ण मिश्राआणि सिद्धार्थ झा,अपेक्षा लॉ ग्लोबल, याचिका कर्ता संजीत शुक्ला यांचे वकील ॲड प्रदीप संचेती,ॲड देशपांडे सह निहार चित्रे,अनिल अंतुरकर जेष्ठ वकील अथर्व हर्षवर्धन सुर्यवंशी व ॲड. कशिश चेलानी व कु.कविता प्रकाश ॲड गौरव चौबे याचिकाकर्त्या साठी ॲड.लुबना अन्सारी, राकेश जे.पांडे याचिकर्त्या साठीअसुन राज्य मागासवर्ग आयोगाचे सर्व बाबींमध्ये ॲड.साकेत मोने आणि अंचिता नायर आणि देवांश शहा विधी पक्षाचे सदस्य आहेत.ॲड बिरेंद्र बी सराफ, एजी.पी. काकडे,जीपी.ओ.ए.चांदूरकर,अतिरिक्त जी.पी,जय संकलेचा,जी.आर.रघुवंशी एजीपी,राज्य/प्रतिनिधी, सर्व बाबीं मध्ये शासनाच्या वतीने वरिष्ठ वकील व्ही.ए थोरात, वरिष्ठ वकील सुश्री प्राची तटके,विशेष वकील पी.पी. काकडे, एजीपी राज्य/प्रतिनिधि दिन्यार, वरिष्ठ वकील चिराग शाह मनिनी रॉय,श्यामसुंदर जाधव,वरिष्ठ वकील वाय. साखरे,उत्सव त्रिवेदी, अर्पित गुप्ता,आशिश कुमार यादव,विशाल आचार्य, ॲड रवी कदम, मनिनी रॉय, श्यामसुंदर जाधव, सचिन पवार, आदर्श व्यास,रुचिता वर्मा, एकताॲड.देवदत्त कामत, वरिष्ठ वकील हर्ष पांडे, हिमांशू सचदेवा पियुष तिवारी, उत्सव त्रिवेदी, अश्विनी बी.जाधव ॲड. एकता दळवी,कविता धानुका,ॲड. जनक द्वारकादास, वरिष्ठ अधिवक्ता नम्रता विनोद, पीयूष तिवारी,अंध्यार्जुन, वरिष्ठ अधिवक्ता हिमांशू सचदेवा,पीयूष तिवारी, उत्सव त्रिवेदी, कु.मनिनी रॉय अर्पित गुप्ता आणि विशाल तसेच मराठा समाजाच्या वतीने मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ता डॉ राजेंद्र दाते पाटील यांच्या साठी ॲड.मधुर अनिल गोलेगावकर व ॲड.श्रेयस संजीव देशपांडे तर सहाय्क म्हणुन ॲड सागर मडके हे कामकाज पहात असून,ॲड श्रीराम पिंगळे,ॲड सूर्यजीत चव्हाण,बजरंग सोळंके, विशाखा शेलार,ॲड रूपेश बोबडे,ॲड श्रद्धा नाकाडी या सह अनेक विधीज्ञ कामकाज पहात आहेत.मराठा समाजाला एसईबीसी कायद्याअंतर्गत दिलेलं आरक्षण आकलना पलिकडचं आहे. सर्वोच्च न्यायालयानं आरक्षणाची घालूनदिलेली ५० टक्के मर्यादा मराठा आरक्षणा मुळे ओलांडली गेली आहे. इतकेच नव्हे तर मराठा आरक्षणामुळे इतर समाजा च्याआरक्षणा वरही अतिक्रमण झाल्याचा दावा याचिका कर्त्यांच्या वतीने हायकोर्टात करण्यात आला आहे.

## उजेडाची ज्योत

मी निघालो
आयुष्याची वाट तुडवीत
काळोख्या रात्रीच्या प्रदेशात
उजेडाची ज्योत घेऊन
सूर्याला भेटण्यास

वाटेवर आलीय वादळे
अडवण्या पावलांच्या गतीला
पडलोय ठोकर लागून अनेकदा

पण थांबलो नाही
चालत राहिलो
कासव गतीने का होईना
उजेड होईपर्यंत

अन् उजाडलं एकदाचं
सोनेरी किरणांनी केला वर्षाव
सुंदर हिरव्यागार धरतीवर

अन् प्रवास आनंददायी झाला



**ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड

## बोलक्या बाहुल्या पुन्हा एकदा राष्ट्रीय सेवेकरिता सज्ज



**सिल्लोड :** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गोळेगाव बुद्रक ता. सिल्लोड येथे मतदान जनजागृतीचा अभिनव उपक्रमजिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने मतदारांमध्ये लोकशाही प्रक्रियेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून मतदान जनजागृतीचा प्रभावी उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात श्रीमती सरला कामे या निवडणूक कार्यांतर्गत स्वीप (SVEEP) कक्षात सक्रियपणे कार्यरत असून, त्यांनी यापूर्वी लोकसभा व विधानसभा निवडणुकांदरम्यान १००% मतदान वाढविण्याच्या उद्देशाने उल्लेखनीय कामगिरी बजावली होती.आता पुन्हा एकदा जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी मतदान जनजागृतीचे कार्य हाती घेतले आहे. त्यांच्या सोबत असलेल्या बोलक्या बाहुल्या ‘गंगाराम’ आणि ‘गंगुबाई’ या ग्रामीण बोलीभाषेतून मतदारांशी संवाद साधत मतदानाचे महत्त्व अत्यंत सोप्या, विनोदी आणि प्रभावी पद्धतीने पटवून देत आहेत. या बाहुल्यांच्या माध्यमातून मतदारांमध्ये उत्साह निर्माण होत असून, नागरिक या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत आहेत.गावातील चौक, शहरातील विविध वार्ड, सार्वजनिक ठिकाणे, बाजारपेठा तसेच वर्दळीच्या परिसरात १००% मतदान करण्याचा संदेश पोहोचविण्यात आला. “मतदान हा आपला हक्क आणि कर्तव्य आहे”, “एकही मत वाया जाऊ देऊ नका” अशा संदेशांद्वारे मतदारांना प्रेरित करण्यात आले. या जनजागृती कार्यक्रमामुळे अनेक मतदार बंधू-भगिनींनी “आम्ही मतदान करणारच” असा ठाम निश्चय यावेळी व्यक्त केला.हा उपक्रम स्वीप टीमचे प्रमुख आदरणीय श्री. राजीव फुसे साहेब तसेच स्वीप समन्वयक व केंद्रप्रमुख आदरणीय श्री. किशोर जगताप साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. या कार्यक्रमात श्रीमती सरला शामराव कामे, श्रीमती ललिता कामे व संपूर्ण स्वीप पथकाने सहभाग घेतला. बोलक्या बाहुल्यांबरोबरच पथनाट्य, थेट संवाद आणि मनोरंजनात्मक सादरीकरणाच्या माध्यमातून मतदार जनजागृती करण्यात आली.श्रीमती सरला कामे या नेहमीच मनोरंजनात्मक अध्यापनाच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक व देशव्यापी समस्यांवर जनजागृती करत असतात. त्यांच्या या अनोख्या उपक्रमामुळे मतदान जनजागृती केवळ माहितीपुरती मर्यादित न राहता लोकांच्या मनावर ठसा उमटवणारी ठरत आहे.लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी आणि १००% मतदानाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरणार असून, नागरिकांचा वाढता सहभाग हीच या प्रयत्नांची खरी पावती आहे.